राज्यातील शासकीय धान्य गोदामांमध्ये अन्नधान्याची पोती शिवण्यासाठी शिवण यंत्रे, हँगींग हूक व शिवण यंत्रासाठी लागणारा धागा गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलद्वारे खरेदी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना...

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक : सामुग्री-३११६/ प्र.क्र. १७१ / ना.पु. १६ अ,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : १६ जानेवारी, २०१८.

वाचा : (१) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-६, दि. ०१ डिसेंबर, २०१६

(२) शासन निर्णय क्र. सामुग्री-३११६/प्र.क्र.१७१/नापु-१६ अ, दि. १७ एप्रिल, २०१७

(३) शासन निर्णय समक्रमांक दि. १५ जुलै, २०१७

(४) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/ उद्योग-४, दि. २४ ऑगस्ट, २०१७

प्रस्तावना :-

राज्यातील शासकीय गोदामांमध्ये अन्नधान्याच्या पोत्यांचे प्रमाणिकरण केल्यानंतर ती शिवण्यासाठी पोती शिवण यंत्रे, हँगींग हूक व शिवण यंत्रासाठी लागणारा धागा यांची खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता व खरेदीसाठी खुली ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये देण्यात आल्या होत्या. त्यानुसार संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई यांनी ई-निविदा प्रक्रिया राबविली. मात्र निविदेमध्ये भाग घेतलेल्या निविदाकारांनी आवश्यक बाबींची पुर्तता केली नसल्याने व निविदेमध्ये इष्टतम स्पर्धा होत नसल्याने विभागीय भांडार खरेदी समितीने निविदा प्रक्रिया रद्द करुन फेर निविदा काढण्याचा निर्णय घेतला.

दरम्यानच्या काळात केंद्र शासनाने राष्ट्रीय खरेदी धोरणांतर्गत (National Public Procurement Policy) खरेदी प्रक्रियेत मोठया प्रमाणात बदल केले आहेत. शासकीय विभाग/संस्थांकडून वस्तु व सेवांच्या खरेदीसाठी केंद्र शासनाने गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) हे पोर्टल विकसित केलेले आहे. सदर पोर्टलची कार्यपध्दती, राज्य शासनास वस्तु व सेवा खरेदी करण्यासाठी स्विकृत करण्यास उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. तसेच त्यानुषंगाने खरेदी प्रक्रियेबाबतच्या दि. १ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयात आवश्यक ते बदल केले आहेत. उपरोक्त बाबी विचारात घेता, शिवणयंत्र व त्याच्या सुट्याभागांचा संच, हँगींग हूक व शिवण यंत्रांसाठी लागणाऱ्या धाग्याच्या खरेदीसाठी फेर

निविदा न काढता सदरची खरेदी ही गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलद्वारे खरेदी करणे व उपरोक्त प्रणालीचा वापर करण्यासाठी प्राधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

राज्यातील शासकीय गोदामांमधील अन्नधान्याच्या पोत्यांचे प्रमाणिकरण केल्यानंतर ती शिवण्यासाठी सहज हाताळता येतील अशी पोती शिवणयंत्रे (Bag Closer Machines) व त्याच्या सुट्याभागांचा संच (Spare Parts), हँगींग हूक (Hanging Hook) व शिवण यंत्रांसाठी लागणाऱ्या धाग्याची (Polypropylene multi-filament thread) खरेदी करण्यास संदर्भ क्र. ३ येथिल शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मात्र उपरोक्त खरेदी ई-निविदा प्रक्रिये ऐवजी गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या केंद्र शासनाच्या पोर्टलवर स्पर्धात्मक ऑनलाईन निविदाद्वारे (Online Bidding) किंवा Reverce Oction प्रक्रियेद्वारे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

पोती शिवणयंत्रे व त्याच्या सुट्याभागांचा संच, हँगींग हुक व पोती शिवण यंत्रांसाठी लागणारा धागा गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलद्वारे खरेदी करण्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे :-

(१) गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलद्वारे खरेदी प्रक्रिया राबविण्याची जबाबदारी:-

१.१ शिवणयंत्र व त्याच्या सुट्याभागांचा संच, हँगींग हूक व शिवण यंत्रांसाठी लागणाऱ्या धाग्याच्या खरेदीची प्रक्रिया उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि. २४ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयानुसार गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या केंद्र शासनाच्या पोर्टलवर स्पर्धात्मक ऑनलाईन निविदाद्वारे (Online Bidding) किंवा Reverce Oction प्रक्रियेद्वारे राबविण्यात यावी. सदरची खरेदी ही संदर्भ क्र. १ येथील उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसार करण्यात यावी.

१.२ सदर प्रणालीचा वापर करण्यासाठी खालील नमूद अधिकाऱ्यांना जबाबदार प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलनुसार सर्व बाबींची पुर्तता करणे बंधनकारक आहे.

अ.क्र.	Role in GeM Portal	Responsibility in GeM Portal	प्राधिकाराऱ्याचे नाव व कार्यालय
१.	Primary User	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा प्रतिनिधी म्हणून विभागाची नोंद GeM Portal वर करणे आणि Buyer,	वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

		Consignee, D. D. O. यांचे Role निश्चित करणे व त्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.	
२.	Secondary User (Buyer)	विभागाच्या वतीने पोती शिवणयंत्रे (Bag Closer Machine) व त्याच्या सुट्या भागांचा संच, हँगिंग हूक, शिवण यंत्रांसाठी लागणारा धागा खरेदी करण्याची कार्यवाही करणे.	नियंत्रक शिधावटप व संचालक, नागरी पुरवठा, चर्चगेट, मुंबई.
३.	Secondary User (Consignee)	GeM Portal वरुन खरेदी केलेला माल स्विकृत करणे व त्याची पोहोच देणे.	सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी
४.	P.A.O./D.D.O.	GeM वरुन खरेदी केलेल्या बाबीचे नियमांनुसार १० दिवसांच्या आत प्रदान करणे	लेखाधिकारी, वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालय.

१.३ गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलवर शिवणयंत्रे, त्यांच्या सुट्याभागांचा संच व हँगींग हुक यांचा एकत्रित संच उपलब्ध असल्याने १) ११०० पोती शिवणयंत्रे, सुट्याभागांचा संच व हँगींग हुक व २) शिवण यंत्रांसाठी लागणाऱ्या १००० मीटर धाग्याच्या १,६५,००० रिळ, अशा दोन प्रकारची खरेदी करण्यात यावी.

१.४ खरेदी करण्यात आलेल्या वस्तु या संबंधित जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयात पोहोच करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करावे. त्यासाठी संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई यांनी वस्तु पाहोच करावयाच्या ठिकाणांची पत्त्यासह यादी गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलवर Upload करण्यासाठी नियंत्रक शिधावटप व संचालक, नागरी पुरवठा, चर्चगेट, मुंबई यांना उपलब्ध करुन दयावी.

(२) खरेदी करावयाच्या वस्तूंची मानके (Specifications):

पोती शिवणयंत्रे व त्यांच्या सुट्याभागांचा संच, हँगींग हूक व शिवण यंत्रांसाठी लागणारा धागा यासाठीची मानके **(Specifications)** या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट "अ"** मध्ये नमूद केली आहेत. या मानकांनुसार खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी. उपरोक्त प्रक्रियेत भाग घेणाऱ्या पुरवठादारास सदर मानकानुसार **(Specifications)** वस्तुंचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

(३) इसाऱ्याची रक्कम :-

३.१ खरेदीच्या प्रकारानुसार इसारा रक्कम पुढील प्रमाणे असेल -

(रुपये)

अ.क्र.	निविदेचा प्रकार	खरेदीची (निविदेची) एकूण किंमत	इसारा रक्कम
१	पोती शिवण यंत्रे, त्यांच्या सुट्या भागांचा संच व हँगीग हूक	१,७६,००,०००/-	२,००,०००/-
२	शिवण यंत्रासाठीचा धागा	१,२५,४०,०००/-	१,५०,०००/-

३.२ इसाऱ्याची रक्कम गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) कार्यप्रणालीमध्ये विहित केल्यानुसार जमा करावी.

३.३ ज्यांनी इसारा रक्कम भरलेली असेल, त्यांना ऑनलाईन खरेदी प्रक्रियेमध्ये भाग घेणे बंधनकारक आहे, खरेदी प्रक्रियेमध्ये भाग न घेतल्यास त्यांची इसाऱ्याची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात यावी.

३.४ विनिर्दिष्टीत केलेल्या इसारा रक्कमेपेक्षा कमी रक्कम भरणाऱ्या पुरवठादारास अपात्र ठरवून भरलेली संपूर्ण रक्कम जप्त करण्यात यावी.

३.५ गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलद्वारे पुरवठादार निश्चित झाल्यावर न्यूनतम पुरवठादारा व्यतिरिक्त उर्वरित सर्व पुरवठादारांची इसारा रक्कम सात दिवसात परत करण्यात यावी.

३.६ इसारा रकमेवर कुठल्याही प्रकारे व्याज देय राहणार नाही.

३.७ इसारा रक्कम दोन महिन्याच्या आत परत न केल्यास झालेल्या विलंबावर १० टक्के व्याज प्रदेय राहिल व व्याजाची पूर्ण रक्कम विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून वसूल करण्यात यावी.

३.८ शासकीय मंडळ /महामंडळ/उपक्रमांना तसेच सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत वरील वस्तुंसाठी नोंदणीकृत असलेल्या उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासुन सुट देण्यात यावी. यामध्ये महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ / महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकाकडून अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र सादर करणे आवश्यक राहील.

(४) अनामत रक्कम (Security Deposit):-

४.१ पुरवठादारास उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि. १ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.४.६ मधील तरतूदीनुसार खरेदी मुल्याच्या किंमतीवर अनामत रक्कम करारनाम्यासोबत धनाकर्षाद्वारे वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे नावे

जमा करावी लागेल. वरील परि. १.३ नुसार सदरची खरेदी ही दोन प्रकारे होणार असल्याने दोन्ही प्रकारासाठी अनामत रक्कम वेगवेगळी घेण्यात यावी.

४.२ अनामत रकमेवर कोणतेही व्याज देय राहणार नाही. तसेच, पुरवठादाराने करारातील कोणत्याही अटीचा भंग केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्याचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल.

४.३ शिवणयंत्रे, त्यांच्या सुट्याभागांचा संच व हँगींग हुकच्या खरेदीबाबत घेतलेली अनामत रक्कम वॉरंटी कालावधी संपेपर्यंत परत करण्यात येऊ नये. वॉरंटी कालावधीत पुरवठादाराविरुध्द कोणतीही तक्रार आली नाही तर इंडेम्निटी बाँड घेऊन अनामत रक्कम परत करण्यात यावी.

(५) पुरवठा कालावधी :

यशस्वी पुरवठादारास नियंत्रक शिधावटप व संचालक, नागरी पुरवठा, चर्चगेट, मुंबई यांनी निर्धारित केलेल्या संख्येनुसार ६० दिवसाच्या कालावधीत या वस्तुंचा पुरवठा संबंधित जिल्हा पुरवठा कार्यालयात स्वत:च्या खर्चाने करावयाचा आहे.

(६) पुरवठादार व खरेदीदरांची जबाबदारी:-

६.१ जर पुरवठादार हा उत्पादक कंपनीचा अधिकृत वितरक असेल तर, त्यास सदर प्रक्रियेत त्याबाबतचे प्राधिकारपत्र सादर करावे लागेल.

६.२ पुरवठादारास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३.१.१.२ नुसार चिन्हांकित नसलेल्या उत्पादनांचा दर्जा तपासण्यासाठी उपरोक्त शासन निर्णयाच्या परिशिष्ठ १२ मध्ये देण्यात आलेल्या यादीतील प्रयोगशाळांकडून शिवणयंत्रे, हँगींग हुक व शिवण यंत्रांसाठी लागणारा धाग्याची तपासणी करुन घेऊन गुणनियंत्रण प्रमाणपत्र गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलवर Upload करणे बंधनकारक आहे. तसेच प्रयोगशाळेकडून गुणनियंत्रण करुन घेतलेली वस्तु नमुन्यादाखल नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, चर्चगेट, मुंबई यांच्या कार्यालयात सादर करावी लागेल. त्यानंतरच पुरवठादाराचा या प्रक्रियेतील भाग ग्राह्य धरण्यात येईल.

६.३ पोती शिवणयंत्रे, त्यांच्या सुट्या भागांचा संच व हँगींग हूक या प्रकारच्या यशस्वी पुरवठादारास शिवण यंत्रासाठी ३ महिन्याची वॉरंटी बंधन कारक असून उपरोक्त कालावधीत मशिनची देखभाल दुरुस्ती करणे त्यांच्यावर बंधनकारक आहे.

६.४ पोती शिवणयंत्र, हँगींग हूक व शिवण यंत्रांसाठी लागणाऱ्या धाग्याचे रिळ वाहतूकीदरम्यान खराब (Damage) झाल्यास त्यास पुरवठादार स्वत: जबाबदार राहील. सदरच्या वस्तु बदलून न दिल्यास त्याची रक्कम अदा करावयाच्या देयकातून कपात करुन घेण्यात येईल.

६.५ परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या मानकांप्रमाणे (Specifications) शिवणयंत्रासोबत त्याचे सुटेभाग (विहित केलेल्या संख्येनुसार) त्याचप्रमाणे इतर आवश्यक साहित्य (Standard accessories) देणे बंधनकारक आहे.

६.६ जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या ठिकाणी शिवणयंत्राचा पुरवठा केल्यानंतर पुरवठादाराने जिल्ह्याच्या ठिकाणी शिवणयंत्राचे प्रात्याक्षिक आयोजित करणे बंधनकारक राहिल. यामध्ये शिवणयंत्राची देखभाल दुरुस्ती, छोटे मोठे दोष निवारण, काही कालावधीनंतर जे सुटे भाग बदलावे लागतात, ते बदलण्याचे प्रात्याक्षिक इ. माहिती शिवणयंत्रे वापरणाऱ्या हमाल कामगारांना देण्यात यावी.

६.७ पुरवठादाराने डिलीव्हरी दिल्यानंतर, डिलीव्हरी चलनावर शिवणयंत्र व त्याच्या सुट्याभागांचा संच, हँगींग हुक, शिवण यंत्रांसाठी लागणाऱ्या धागा (रिळ) ताब्यात घेणाऱ्या गोदामपाल/ गोदाम व्यवस्थापक यांच्या सही शिक्क्यानंतर डिलीव्हरी चलनावर जिल्हा पुरवठा अधिकारी/ सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी प्रती स्वाक्षरी करुन शिक्का मारावा. संबंधित गोदामपाल / गोदाम व्यवस्थापक यांनी उत्पादकाचे चिन्हांकन, उत्पादन दिनांक, दर्जा (धाग्याच्या बाबतीत १००० मीटरचे रिळ असल्याचे) योग्य असल्याबाबत खातरजमा करुन **परिशिष्ट-ब** मध्ये विहित केल्यानूसार प्रमाणपत्र द्यावे.

६.८ उपरोक्त ६.७ प्रमाणे कार्यवाही केल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलवर वस्तु प्राप्त झाल्याबाबतची आवश्यकती नोंद करावी. त्यानंतर देयक प्रदानासाठीची गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवरील मुदत विचारात घेऊन, लेखाधिकारी, वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालय यांनी देयके अदा करावीत.

(७) करारनाम्यास मंजूरी:-

७.१ शासनाच्या वतीने यशस्वी पुरवठादारासोबत करारनामा करण्यासाठी नियंत्रक शिधावटप व संचालक, नागरी पुरवठा, चर्चगेट, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

७.२ या शासन निर्णयानुसार गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलवरील यशस्वी पुरवठादारासोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यास या शासन निर्णयातील सर्व तरतूदी लागू राहतील. तसे करारनाम्यात नमूद करण्यात यावे.

७.३ करारनाम्यावर नियंत्रक शिधावटप व संचालक, नागरी पुरवठा, चर्चगेट, मुंबई व पुरवठादार यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.

७.४ करारनाम्याच्या प्रत्येक पानावर व दुरुस्तीच्या ठिकाणी नियंत्रक शिधावटप व संचालक, नागरी पुरवठा, चर्चगेट, मुंबई व पुरवठादार यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.

(८) पुरवठ्यास विलंब झाल्यास करावयाची कार्यवाही :-

८.१ विलंब शुल्काच्या आकारणीबाबत भांडार खरेदी नियमावलीच्या दिनांक १ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट-४(अ) मध्ये दर्शविल्यानुसार मालाची किंमत रु. २ लाखापेक्षा जास्त नसल्यास प्रती हप्ता विलंबास ½ टक्के विलंब शुल्क व कमाल मर्यादा १० टक्क्यांच्या मर्यादेत विलंब शुल्काची आकारणी करण्याची तरतूद आहे. तसेच मालाची किंमत रु. २ लाखापेक्षा जास्त असल्यास प्रती हप्ता विलंबास ½ टक्के विलंब शुल्क व कमाल मर्यादा ५ टक्क्यांच्या मर्यादेत विलंब शुल्काची आकारणी करण्याची तरतूद आहे. पुरवठयास विलंब झाल्यास सदर तरतूदीनुसार पुरवठादाराच्या देयकातून विलंब शुल्क वसूल करण्यात येईल.

८.२ शिवण यंत्रांसाठी लागणारा धागा (Polypropylene multi-filament thread) पुरवठादाराने विहित मुदतीत पुरवठा न केल्यामुळे स्थानिकरित्या खरेदी करावी लागल्यास किंमतीतील तफावतीची रक्कम पुरवठादाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

(९) करारनाम्यातील तरतूदीसंदर्भात वाद विवाद व अपिल:-

करारनाम्यातील तरततूदीसंदर्भात तसेच दंड, वसूली इ. संदर्भात नियंत्रक शिधावटप व संचालक, नागरी पुरवठा, चर्चगेट, मुंबई यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द, निर्णय दिल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात पुरवठादार शासनाकडे कडे दाद मागू शकेल. शासनाने दिलेला निर्णय अंतिम राहील आणि तो दोन्ही पक्षांना बंधनकारक राहील. पुरवठादार करारनामा संपल्यानंतर जास्तीत जास्त ६ महिन्यात करारनाम्यातील तरतूदीसंदर्भात दाद मागू शकेल.

(१०) पोती शिवणयंत्र चालविण्यासाठी २T किंवा SEA१० या प्रकारचे वंगण तेल लागणार असून सदरचे तेल हे आवश्यकतेनुसार जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या स्थानिक निधीतून खरेदी करावे.

(११) या कामी येणारा खर्च हा अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वित्तीय सल्लागार व उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचे वैयक्तिक ठेव लेख्यामधून मागणी क्रमांक एम-४, "४४०८ अन्न साठवणूक व वखार साठवणूक व वखार साठवण यावरील भांडवली खर्च, मुख्य लेखाशिर्ष (०२)(१०) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेखालील मुंबई शहर अन्नधान्य खरेदीवरील अनुषंगिक खर्च (अनिवार्य), ४४०८ ०३२६, या लेखाशिर्षा खाली खर्ची टाकण्यात यावा व सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

(१२) सदर शासन निर्णय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र.रवका-१०९८/५६७/प्र.क्र.२३३८/नापु-१२, दि.३० नोव्हेंबर, १९९८, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग-२, उपविभाग-४, अ.क्र.१५ व २७ प्रमाणे प्रशासनिक विभागास प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

(१३) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०११६११३९४७४४०६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish Shridhar Supe

Digitally signed by Satish Shridhar Supe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f7773ccec10687b16ba0f2d3f7f9e6f87fe68f9b1b2cb5b73b75bab952ca0621, cn=Satish Shridhar Supe
Date: 2018.01.16 11:59:27 +05'30'

(सतिश श्रीधर सुपे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
२) मा.राज्य मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
३) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५) विकास आयुक्त(उद्योग), उद्योग संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व विभागीय आयुक्त,
७) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
८) संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई
९) सर्व उपायुक्त (पुरवठा), विभागीय आयुक्त, कार्यालय
१०) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
११) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
१२) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.
१३) उप संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.
१४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
१५) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
१६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
१७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
१८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
१९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, नागरी पुरवठा, लेखा परीक्षा परिमंडळ द्वारा: वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
२०) वित्त विभाग (व्यय ४), मंत्रालय, मुंबई.
२१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.
२२) निवड नस्ती/नापु-१६अ.

(अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : सामुग्री-३११६/प्र.क्र. १७१/ना.पु.१६अ,
दिनांक : १६ जानेवारी, २०१८ सोबतचे सहपत्र)

(पोती शिवणयंत्रे (Bag Closer Machines), त्याच्या सुट्याभागांचा संच (Spare Parts)(यादी व संख्या), हँगींग हुक (Hanging Hook) व शिवण यंत्रांसाठी लागणाऱ्या धाग्याची (Polypropylene multi-filament thread) च्या मानगांचे विवरणपत्र)

परिशिष्ट- अ

(१) शिवणयंत्रांसाठीची मानके (specifications of bag closing machine) व आवश्यक सुट्या भागाची यादी व संख्या:

- Sewing Speed: Minimum 1600-1800 stiches per minute (5-8 bags per minute)
  - ✓ Stich Length: 6-8 mm
  - ✓ Single needle, single thread chain stitch sewing machine.
- Operating Materials:
  - ✓ Must sew 10 mm and thicker materials (all kinds of multi-wall papers, burlap, cotton, PP/PE, woven polyester, jute etc.).
  - ✓ All stiches must be tight, leak free (grains), uniformly spaced, no skip stitching and no unusual thread breaking.
- Power Requirements: 220V, single phase. AC/DC Motor of min. 1/10 HP
- Net weight of machines: not more than 7.0 kg.
- Dust proof sealed cover on machine. It is expected that machine must be sturdy and suitable for continuous operation without overheating. It is expected that parts of machine must be manufactured from wear resistance material. Common sewing machine parts such as bush needle bar, bush pressure bar, needle plate/throat plate, pressure bar, bushing looper shaft, looper, main shaft, etc. must be manufactured from mild steel or other high grade material with good hardness value.
- Holding handle of suitable material for firm grip and comfort while operating machine.
- Oil/greasing holes for lubrication of moving functional parts and to prevent wear of parts.

- In addition to standard spare parts and accessories, following items (with stated quantities) must be supplied with each machine. The unit price of each item must be clearly and separately stated with the quoted machine price:

Spare part item	Required quantities to be supplied with each
a. Motor carbon with	12 pieces
b. Throat plates	2 pieces
c. Needle lock nuts	6 pieces
d. Needle bar with २	1 piece
e. Motor carbon holder cap	5 pieces
f. Belts	4 pieces
g. Needles	20 Pieces
h. Looper	8 pieces

- Maintenance and Service Conditions: Warranty of minimum 90 days for any manufacturing defect. All details such as annual maintenance cost, parts covered under warranty period and other terms of contract must be clearly mentioned.
- Availability of spare parts and expertise for repair/maintenance at local/taluka level.
- Operating threads: Cotton and synthetic threads in the range of 500-1400 Twin Denier.
- Mechanical type of cutter to cut threads after closure of bags.
- Machine surface must be smooth and free from defects. Paint shall not be peeled easily from machine surface. No signs of overheating, breakage and manufacturing defects should be observed after continuous usage of machine (as per BIS standards). Machine should run smoothly without any abnormal/fatigues sound.
- Maximum dimensions of machine : 22” x 18” x 18”
- Standard accessories (Minimum these many parts must be supplied as a standard accessories):

  १. Accessories box, 2. Allen keys, 3. Needles (minimum 3 needles), 4. Wrench, 5. Screw driver, 6. Oil can, 7. Looper

(२) हँगींग हुकची मानके (Specifications of Spring loaded Suspention unit (Hook)) :

Suspension units are required to hold portable bag closure machines. The brief characteristics of suspension units are as follows:

- Must hold portable bag closure machines of minimum 7 kg weight. There must be two hooks with a locking system; one hook to hang the unit on bar and other hook to hold a portable bag closure machine at the end of rope of suspension unit

- Suspension unit must have a metallic rope of minimum 5 mm diameter and a length more than 4 feet.
- Rope must be spring loaded with a self re-winding arrangement with a provision to control rope length

(३) शिवण यंत्रांसाठी लागणाऱ्या धाग्याची (Polypropylene multi-filament thread) मानके :

Material	Polypropylene (multi-filament thread)
Construction	210/3x2
Twin Denier	1250 (±5%) gms
Breaking strength	7 (-5%) kg
% Elongation	Less than 30%
Tenacity	5.5 (-5% variation)
Twist per meter	250/200
Weight of cones	150 to 160 gms (Y cones of 1000 meter length threads)
Length of thread in each cone	1000 meters
Colour	Dual Colour
Compatible for working on portable bag closing machine and suitable for stitching of PP HDPE, jute and paper bags.	

(अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : सामुग्री-३११६/प्र.क्र. १७१ /ना.पु.१६अ
दिनांक : १६ जानेवारी, २०१८ सोबतचे सहपत्र)

परिशिष्ट- ब

(शासन निर्णयातील परिच्छेद ६.७ नुसार द्यावयाचे प्रमाणपत्र)

प्रति,

नियंत्रक शिधावाटप व संचालक,
नागरी पुरवठा, चर्चगेट, मुंबई

विषय :- शिवणयंत्रे, सुटे भाग, हँगींग हुक/पी.एम. थ्रेड जिल्ह्यासाठी प्राप्त झाल्याबाबतचे प्रमाणपत्र देणेबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्र. सामुग्री-३११६/प्र.क्र. १७१ /ना.पु.१६अ
दिनांक, १६ जानेवारी, २०१८

महोदय,

प्रमाणित करण्यात येते की, मेसर्स ------------------------------- यांचेकडून या कार्यालयास दिनांक ------ रोजी ------ इतकी पोती शिवण यंत्रे (इतर आवश्यक साहित्यासह), सुट्या भागांचा संच, हँगींग हुक / प्रती रीळ १००० मीटर याप्रमाणे --------- इतके रीळ (पी. एम थ्रेड) सुस्थितीत प्राप्त झाले आहेत. नोंद घेण्याची दक्षता घेण्यात येत आहे. ही शिवणयंत्रे वापरण्याचे पूर्ण प्रशिक्षण प्रात्यक्षिकासह देण्यात आलेले आहे. शिवणयंत्रामध्ये वारंवार होणाऱ्या दोषांची माहिती व आवश्यक सुटे भाग बदलण्याचे प्रशिक्षण देखील पुरवठादाराकडून देण्यात आलेले आहे. करीता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

दिनांक

स्वाक्षरी/-
जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी

गोल शिक्का